मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# युनेस्कोच्या 'वारसा स्थळ' किल्ल्यांवर आधारित!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून भव्य 'दुर्गोत्सव 2025' स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनीधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी दिवाळी काळात राज्यभरात किल्ल्यांची उभारणी केली जाते. या परंपरेतून बालकांपासून प्रौढांपर्यंत सर्वांमध्ये इतिहास, शौर्य आणि संस्कृतीची जाणीव निर्माण होते. या पारंपरिक उपक्रमाला यंदा विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्रातील ११ ऐतिहासिक किल्ल्यांचा आणि तामिळनाडूतील १ किल्ल्याचा अशा एकूण १२ किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश केला आहे. हा सन्मान महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.




या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने 'दुर्गोत्सव २०२५' या विशेष उपक्रमाचे आयोजन केले आहे. पिंपरी, १७ ऑक्टोबर २०२५ रोजी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या या उपक्रमाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान निर्माण व्हावा, तसेच पर्यावरणपूरक साहित्य वापरून किल्ल्यांची उभारणी व्हावी या उद्देशाने यंदा 'दुर्गोत्सव' ही संकल्पना राबविण्यात येत आहे.

या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांनी युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समाविष्ट झालेल्या किल्ल्यांपैकी एखाद्या किल्ल्याचे मॉडेल आपल्या घरात, अंगणात, बाल्कनीत किंवा सोसायटीच्या चौकात तयार करावे.

तयार केलेल्या किल्ल्यांचे छायाचित्र काढून ते 'दुर्गोत्सव २०२५' साठी उपलब्ध करून दिलेल्या बारकोडद्वारे स्कॅन करून अपलोड करावे. निर्धारित कालावधीत अपलोड केलेल्या नोंदींच्या आधारे प्रत्येक सहभागीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या हस्ताक्षराचे सन्मानपत्र (E-CERTIFICATE) प्रदान करण्यात येईल.

> छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा हा आपला अभिमान आहे. 'दुर्गोत्सव २०२५' च्या माध्यमातून आपण या वारशांचे संवर्धन करत नव्या पिढीमध्ये इतिहासाबद्दल आदर आणि प्रेरणा निर्माण करूया. या सर्व उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये स्वाभिमान, राष्ट्रभक्ती आणि इतिहासप्रेमाची भावना दृढ करण्याचे उद्दिष्ट चिंचवड महानगरपालिकेने ठेवले आहे.
>
> - श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> आजच्या वेगवान जगात परंपरा जपण्याची जबाबदारी आपलीच आहे. शिवछत्रपतींच्या दुर्गांची प्रतिकृती तयार करण्याचा उपक्रम हा केवळ कलात्मक प्रयत्न नाही, तर आपल्या मुलांना इतिहासाशी, संस्कृतीशी आणि मातृभूमीशी जोडणारा दुवा आहे. या माध्यमातून आपण पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या अभिमानाला पुन्हा नवजीवन देत आहे.
>
> - अण्णा बोदडे, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# महापालिकेचे निवृत्त सहाय्यक आरोग्य निरीक्षक नवनाथ मस्के यांचा आम आदमी पार्टीत प्रवेश

## पक्षाचे शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या हस्ते त्यांना शहर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली

**पिंपरी | प्रतिनीधी**

आम आदमी पार्टी, पिंपरी-चिंचवड शहरात संघटन मजबूत करण्याच्या आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षविस्ताराच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत आहे. नवनाथ दशरथ मस्के यांनी आम आदमी पार्टीत प्रवेश केला असून, पक्षाचे शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या हस्ते त्यांना शहर उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पक्षाचे कामगार आघाडी उपाध्यक्ष लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली आणि अनेक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. यावेळी मस्के यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

सामाजिक क्षेत्रात नवनाथ मस्के यांचे उल्लेखनीय कार्य आहे. त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'अ' क्षेत्रीय कार्यालयात सहाय्यक आरोग्य निरीक्षक म्हणून काम केले असून, ते भीमशक्ती सामाजिक संघटनेचे पिंपरी-चिंचवड शहर उपाध्यक्ष राहिले आहेत आणि




अनेक सामाजिक, आरोग्यविषयक व जनजागृती उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला आहे.

या प्रसंगी बोलताना शहराध्यक्ष रविराज काळे म्हणाले, "नवनाथ मस्के यांच्या रूपाने आम आदमी पार्टीला एक ऊर्जावान आणि लोकसंग्रही नेतृत्व लाभले आहे. ते पक्षाचे विचार आणि धोरणे पिंपरी-चिंचवडच्या जनतेपर्यंत प्रामाणिकपणे पोहोचवतील, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. त्यांच्या नव्या जबाबदारीसाठी त्यांना शुभेच्छा देतो."

आपल्या नियुक्तीनंतर मस्के यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले आणि म्हणाले, मी पक्षाच्या मूल्यानुसार प्रामाणिकपणे काम करीन आणि आम आदमी पार्टीला पिंपरी - चिंचवड शहरात मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीन.

नवनाथ मस्के यांचा पक्षप्रवेश आणि त्यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती ही आम आदमी पार्टीच्या पिंपरी - चिंचवड शहरात संघटनात्मक वाढीसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

# आस्मानी संकटात पिंपरी-चिंचवडकरांचा कायम "एक हात मदतीचा"

## मराठवाड्यातील गरजवंत शेतकऱ्यांना 106 गोधन मोफत वितरण; आमदार महेश लांडगे यांचा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आस्मानी संकट डोळ्यांसमोर असताना कोणीतरी मदतीसाठी येईल आणि तो ईश्वरच असेल, असा विचार शेतकरी करीत असतो. त्यावेळी भोसरीसह पिंपरी-चिंचवडमधील असंख्य हात नेहमीच मदतीसाठी पुढे येतात. सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने हाती घेतलेला "एक हात गोधन"चा उपक्रमामुळे पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळणार आहे, अशी भावना भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.



हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाडा आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांमधील गरजवंतांना पहिल्या टप्प्यात १०६ गायींचे दान करण्यात आले. त्यासाठी आयोजित केलेल्या गोपूजन सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, माजी महापौर हिरानानी घुले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेमंत हरहरे, भाजपा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी, उद्योग-व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, २०१८-१९ मध्ये कोल्हापूर-सांगली जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात महापूर आला होता. त्यावेळी आम्ही "एक हात मदतीचा" असा उपक्रम हाती घेतला. त्याला लोकसहभागातून ८० पेक्षा जास्त गाड्यांमधून मदत रवाना केली. पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो लोकांनी मदत केली. शहरातील 'रेस्क्यू टीम' सुद्धा त्याठिकाणी कार्यरत होती.

आमच्या शहरातील नागरीक भावनिक आहेत. चिपळून-सिंधुदुर्गमध्ये निसर्ग चक्रीवादळाच्या संकटातसुद्धा आम्ही मदत नव्हे, तर कर्तव्य-जबाबदारी म्हणून मदतकार्य केले. आता मराठवाडा आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर संकट म्हणजे आपल्या बांधवांवरील संकट आहे, अशा भावनेतून आम्ही मदतकार्य हाती घेतले. पहिल्या टप्प्यात ५१ गाड्या मदत रवाना केली. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात गोधन मोफत वाटप करण्याचा निर्णय घेतला, असेही आमदार लांडगे म्हणाले.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ वढू-तुळापूर येथील शंभूसृष्टीच्या कामासाठी रविंद्र चव्हाण यांनी पुढाकार घेतला. तसेच, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या इमारत उभारणीबाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चव्हाण यांनी सकारात्मक निर्णय घेतले, अशा आठवणींना उजाळा आमदार महेश लांडगे यांनी दिला.

### राष्ट्रीयत्व व हिंदुत्वाचा वारसा पुढे न्यायाचा : चव्हाण

» धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच शिल्प "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" उभारण्यात येत आहे. या शंभूसृष्टीमध्ये आयोजित केलेल्या "ऐतिहासिक मानवंदना" सोहळ्याची वर्ल्ड बूक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली. या भव्य शिल्पाच्या राष्ट्रार्पण सोहळा अतिभव्य करणार आहोत. त्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आपण मदत करावी, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले. त्याला प्रतिसाद देताना "देशात राष्ट्रीयत्व आणि हिंदुत्व यांचा वारसा पुढे न्यायचा असेल, तर छत्रपतींच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक वास्तूपुढे नतमस्तक व्हावे लागेल." त्यामुळे मी निश्चितपणे सहभागी होईल, असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिला.

# आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून चिंचवड विधानसभेत 'दिवाळी गिफ्ट'

## राज्य शासनाकडून राबविलेल्या जाणा-या विविध योजनांमधून सुमारे 12 कोटींचा निधी मंजूर

**पिंपरी | प्रतिनीधी**

चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून राज्य शासनाकडून राबविलेल्या जाणा-या विविध योजनांमधून सुमारे १२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून मतदारसंघातील नागरिकांच्या सेवा-सुविधांशी निगडीत कामे होणार आहे. दिवाळी सणाच्या निमित्ताने एकप्रकारे हे चिंचवड विधानसभेत दिवाळी गिफ्ट मिळाले असून हा शासन निधी पिंपरी-चिंचवड शहरासोबतच विशेषतः वाकड, पुनावळे,मामुर्डी आणि किवळे या झपाट्याने वाढणाऱ्या भागाला अधिकचा निधी देऊन तेथील विकासाला हातभार लागला आहे.



राज्यातील महायुती सरकार विकासाचे उद्दिष्ट साध्य करणारे व जनतेच्या मनातील आशा-आकांक्षा पूर्ण करणारे आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार शंकर जगताप यांच्याकडून सातत्याने शासनाच्या माध्यमातून विविध कामांसाठी निधी उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून दिवाळी सणाच्या पुर्वसंध्येला शासनाकडून चिंचवड विधानसभेतील अनेक कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला.

महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत चार महत्वकांक्षी कामांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये रावेत येथे सुसज्ज बहुउद्देशीय इमारत बांधणे, मामुर्डी येथील मनपाच्या जागेत क्रीडासंकुल उभारणे, वाकड वेणूनगर येथे क्रीडा संकुल उभारणे, किवळे येथीलजागेत राष्ट्रीय दर्जाचे भारतरत्न उद्यान विस्तारीकरण करणे या मोठ्या कामांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये वाकडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सभागृह बांधणे, क्रीडासंकुल उभारणे. जलतरण तलाव बांधणे, टेनिस कोर्ट तयार करणे, तसेच पुनावळेमध्ये सभागृह, वाचनालय, विरंगुळा केंद्र बांधणे आणि सांगवी परिसरात विविध सुशोभिकरणाच्या कामांचा समावेश आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत १४ कामांसाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी २० लाख रुपयांचा निधी या कामांसाठी उपलब्ध देखील करून देण्यात आलेला आहे. या अंतर्गत किवळे एमबी कॅम्प झोपडपट्टीत पाण्याची लाईन, ड्रेनेज लाईन टाकणे, वाचनालय उभारणे, कॉंक्रिटीकरण करणे, सभा मंडप बांधणे, तसेच नागसेन नगर झोपडपट्टी येथे वाहतूक बेटाचे सुशोभीकरण करणे, नवीन स्वच्छतागृह उभारणे, पिंपळे गुरव लक्ष्मीनगर येथे बुद्धविहाराचे सीमाभित व विहारात अभ्यासिका तयार करणे, वेताळनगर झोपडपट्टी बौद्ध विहार परिसरात विविध कामे करणे, थेरगाव जगतापनगर येथील दलितवस्ती परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे आणि राजीव गांधीनगर पिंपळे गुरव झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकणे या कामांचा समावेश आहे.

> " वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधांची गरज प्रचंड वाढली आहे. शासनाकडून मंजूर झालेला हा १२ कोटींचा निधी म्हणजे विकसित आणि स्मार्ट चिंचवड मतदारसंघाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. विशेषतः वाकड, पुनावळे, रावेत, मामुर्डी आणि किवळे या झपाट्याने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना या कामांचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ होईल. खेळाडू, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांसाठी निर्माण होणारी नवीन केंद्रे ही आरोग्यदायी, सशक्त आणि विकसित चिंचवडच्या' निर्मितीकडे एक ठोस पाऊल आहे. शासन निधीचा योग्य वापर करून प्रत्येक नागरिकापर्यंत विकास पोहोचवणे, हेच आमचे ध्येय आहे.
>
> – शंकर जगताप, आमदार,
> चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

# दिवाळीनंतर मुंबई-पुण्यात परतण्याची लगबग

## महामार्गांवर कोंडीची शक्यता; पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याच्या पोलिसांकडून सूचना



**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीत मूळगावी गेलेले नागरिक पुणे, मुंबईकडे परतण्यास शुक्रवारपासून (२४ ऑक्टोबर) सुरुवात होणार आहे. गावाहून परतणाऱ्या नागरिकांच्या मोटारी, खासगी बसमुळे महामार्गांवर वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस, पुणे पोलीस, तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक विभागाने वाहनचालकांना महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अवलंब करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

पुणे, मुंबईत नोकरी, व्यवसायानिमित्त अनेकजण वास्तव्यास आहेत. पुण्यात शिक्षणानिमित्त मोठ्या संख्येने विद्यार्थी वास्तव्यास आहेत. दिवाळी संपल्यानंतर २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान महामार्गावरील वर्दळ वाढण्याची शक्यता आहे. परगावाहून, तसेच परराज्यातून अनेकजण पुणे-मुंबईकडे रवाना होणार अहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस दलाचे पुणे विभागाचे पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी वाहनचालकांना आवाहन केले आहे.

मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, तसेच बाह्यवळण मार्गावरील वर्दळ वाढणार आहे. कोल्हापूरहून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मीरा भाईंदरकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असणार आहे. नाशिक-पुणे महामार्गावरील चाकण परिसरातून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतुकीचा वेग संथ होण्याची शक्यता आहे. सोलापूरहून पुण्याकडे मोठ्या संख्येने वाहने येणार आहेत. या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. मोटारी, खासगी बसने पुण्याकडे येणे टाळावे. महामार्गावरील गर्दी आणि कोंडी विचारात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे. २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत प्रवास टाळावा. महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा. पोलिसांनी दिलेल्या नियमांचे आणि सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसंकडून करण्यात आले आहे.

### पुणे-मुंबईकडे जाणाऱ्या वाहनचालकांसाठी सूचना

- शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा
- महामार्गावरील गर्दी विचारात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे
- सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत प्रवास टाळावा
- महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा
- वेगावर नियंत्रण ठेवावे
- वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवास करावा.

# पुणेकरांची यंदाची दिवाळी कमी प्रदूषणाची!

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात यंदा दिवाळीत हवा प्रदूषण कमी झाले



**पुणे | प्रतिनीधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात यंदा दिवाळीत हवा प्रदूषण कमी झाले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा हवेच्या गुणवत्तेत सुधारणा नोंदविण्यात आली आहे. दिवाळी सुट्यांमुळे बंद असलेली बांधकामे, रस्त्यांवरील वाहनांची कमी झालेली संख्या आणि पाऊस यामुळे प्रदूषणात घट झाल्याचे समोर आले आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, पुणे परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक १९ ऑक्टोबरला सरासरी १६२ एवढा होता. त्यात वाकडमधील भूमकर चौकात सर्वाधिक ३०० नोंद करण्यात आली. ही हवेची अतिखराब पातळी मानली जाते. त्या खालोखाल पुण्यातील लोहगाव येथील म्हाडा कॉलनीत हवा गुणवत्ता निर्देशांक २४४ वर नोंदविण्यात आला होता.

त्यानंतर पाषाणमधील पंचवटी १२१, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ११६, निगडी १०८ आणि हडपसर ८८ अशी हवा गुणवत्ता निर्देशांकाची नोंद झाली होती. त्यामुळे पुण्यातील हवेची गुणवत्ता समाधानकारक ते अतिखराब श्रेणीत होती.

दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे हवा प्रदूषणात आणखी वाढ होण्याची शक्यता होती. परंतु दिवाळी सुट्यांमुळे शहरातील मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांची बांधकामे बंद राहिली. या प्रकल्पातून निर्माण होणारी धूळ मोठ्या प्रमाणात प्रदूषणास कारणीभूत ठरते. त्याचमुळे वाकड परिसरात हवा गुणवत्ता निर्देशांक सातत्याने खराब पातळीवर असतो. बांधकामे बंद असल्याने धूळ कमी होऊन प्रदूषणात घट झाली. याचबरोबर दिवाळीतील सलग सुट्यांमुळे रस्त्यांवरील वाहनांची संख्याही कमी झाली. पावसामुळे हवा प्रदूषण कमी होण्यास मदत झाली.

यामुळे पुण्यात दिवाळीच्या काळात हवा गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक ते मध्यम या पातळीवर नोंदवण्यात आला. दिवाळीत २१ ते २३ ऑक्टोबर दरम्यान हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा दिसून आली. लक्ष्मीपूजनादिवशी (ता. २१) हवा गुणवत्ता निर्देशांक १२९, दिवाळी पाडव्यादिवशी (ता. २२) हवा गुणवत्ता निर्देशांक ११६ आणि भाऊबीजेदिवशी (ता. २३) हवा गुणवत्ता निर्देशांक ८१ नोंदवण्यात आला.

### हवा गुणवत्ता निर्देशांक – हवेची गुणवत्ता – त्रास

- ० ते ५० – चांगली – हवेचा कोणताही वाईट परिणाम आरोग्यावर नाही.
- ५१ ते १०० समाधानकारक – आधीपासून श्वसनविकार असलेल्या रुग्णांना किरकोळ त्रास.
- १०१ ते २०० – मध्यम – फुफ्फुस, दमा, हृदयविकार असलेल्या रुग्णांना श्वसनास त्रास.
- २०१ ते ३०० – खराब – दीर्घ काळ या हवेच्या संपर्कात राहिल्यास निरोगी नागरिकांना श्वसनास त्रास.

# महापालिकेत 12 अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

## आयुक्त नवल किशोर राम यांचा इशारा – कामचुकारपणा आणि हलगर्जीपणाला थारा नाही

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेचा पदभार स्वीकारल्यानंतर आयुक्तांनी क्षेत्रीय कार्यालयांना अधिकार आणि निधी दोन्ही वाढवून दिले असतानाही अनेक सहाय्यक आयुक्त कामकाजात कामचुकारपणा करत असल्याचे समोर आले आहे.

शहरातील स्वच्छता, अतिक्रमण, अनधिकृत फ्लेक्स, रस्ते व सांडपाणी यांसारख्या पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणारे कामचुकार अधिकारी आयुक्त नवल किशोर राम यांच्या रडावरवर आले असून, गेल्या काही दिवसांत 12 अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.



आयुक्त नवल किशोर राम यांनी शहरातील समस्यांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. अलीकडेच त्यांनी केलेल्या पाहणीत अनेक भागांतील स्वच्छतेची दयनीय स्थिती, रस्त्यांवरील सांडपाणी, पडलेला कचरा, तसेच तक्रारींचे निवारण न होणे यांसारख्या त्रुटी निदर्शनास आल्या. त्यामुळे आयुक्तांनी संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांची थेट बदली आणि निलंबनाची कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

नगरसेवक नसल्याने गेल्या साडेतीन वर्षांपासून प्रशासकांच्या ताब्यात असलेल्या महापालिकेत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरील नियंत्रण कमी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अनेक नागरिकांनी क्षेत्रीय कार्यालयांत तक्रार करूनही कामे न झाल्याची खंत व्यक्त केली आहे. काही अधिकारी उशिरा कामावर हजेरी लावणे, वेळेआधी कार्यालयातून निघून जाणे अशा प्रकारांमध्ये गुंतले असून, त्याचा परिणाम थेट शहराच्या प्रशासनावर होत आहे. आयुक्तांकडे नागरिकांच्या तक्रारी वाढल्याने त्यांनी स्वतःच शहरभर पाहणी मोहीम सुरू केली आहे. आरोग्य, स्वच्छता, सांडपाणी, रस्ते आणि अतिक्रमण अशा विविध विषयांवरील स्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना थेट जागेवर अधिकाऱ्यांना दिल्या जात आहेत.

### 12 अधिकाऱ्यांवर निलंबनाची व बदलीची कारवाई

**» गेल्या काही दिवसांत आयुक्तांनी नगर रस्ता वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्त व दोन अभियंत्यांची बदली केली. हडपसर क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांचीदेखील बदली करण्यात आली. शाखा अभियंता, आरोग्य निरीक्षक व मुकादम यांचे निलंबन तर घोले रस्ता-शिवाजीनगर क्षेत्रीय कार्यालयातील चार वरिष्ठ अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. आयुक्तांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, पुढील काळात निष्क्रियता, हलगर्जीपणा किंवा नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांना थेट कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.**

# बिबट्याच्या हल्ल्यात ज्येष्ठ महिलेच्या मृत्यू

## शिरूरमधील जांबूत येथे बिबट्याच्या हल्ल्यात ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली

**पुणे | प्रतिनीधी**

शिरूरमधील जांबूत येथे बिबट्याच्या हल्ल्यात ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. त्यामुळे या परिसरात घबराट पसरली आहे. भागुबाई रंगनाथ जाधव (वय ७२) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ महिलेचे नाव आहे. शिरूर तालुक्यात आतापर्यंत दहा जणांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास जांबुतमधील थोरातवस्ती येथे राहणाऱ्या भागुबाई या लघुशंकेसाठी घराबाहेर पडल्या असताना बिबट्याने हल्ला करून त्यांना उसाच्या शेतात ओढून नेले. त्या घरात न आल्याने त्यांच्या मुलाने शोध घेतला असता, त्यांचा मृतदेह घरापासून पाचशे मीटर अंतरावर सापडला.

‘जांबुत येथे बिबट्याला पकडण्यासाठी १४ पिंजरे लावण्यात आले आहेत. पिंपरखेड परिसरात मागील आठ दिवसांत ३ बिबटे आणि टाकळी हाजी येथे एक असे चार बिबटे जेरबंद करण्यात आले आहेत,’ असे तालुका वनाधिकारी नीलकंठ गव्हाणे यांनी सांगितले. दरम्यान, १२ ऑक्टोबर रोजी पिंपरखेड येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शिवन्या शैलेश बोंबे या साडेपाच वर्षांच्या बालिकेचे निधन झाले. त्यानंतर आता ज्येष्ठ महिलेच्या मृत्यूमुळे या परिसरात घबराट पसरली आहे. यापूर्वी पिंपरखेड, जांबुतमधील समृद्ध सचिन जोरी, पूजा भगवान नरवडे, पूजा जालिंधर जाधव, मुक्ताबाई भाऊ खाडे, इनामगाव येथील लक्ष्मीबाई बबन भोईटे, टेंभेकर वस्ती येथील शिवतेज टेंभेकर, वश सिंग आणि रक्षा निकम यांना बिबट्यांच्या हल्ल्यात प्राण गमवावा लागला आहे.



**बिबट्यांचा वावर वाढला**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड, जांबुत, टाकळी हाजी; तसेच मांडवगण फराटा, इनामगाव या परिसरात बिबट्यांनी हल्ले केल्याच्या घटना घडल्या आहेत. जुन्नर, आंबेगाव आणि खेड या तालुक्यांमध्ये बिबट्यांचा वावर असतो. मात्र, मागील काही वर्षांपासून शिरूर तालुक्यातही बिबटे आढळून येत आहेत. पूर्वी शिरूर तालुक्यातील जांबूत, पिंपरखेड, टाकळी हाजी, फाकटे, कवठे येमाई या बेट भागात बिबट्याचा वावर असायचा. आता मांडवगण फराटा, वडगाव रासाई, पिंपळसुटी, इनामगाव, न्हावरा या पूर्व भागातही बिबटे आढळून येत आहेत.

शिरूर तालुक्यात डिंभे आणि चासकमान कालव्यांमुळे बागायती क्षेत्र वाढले आहे. त्यामध्ये उसाचे पीक मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे बिबट्यांची संख्या वाढली आहे. भक्ष्य न मिळाल्यास बिबटे मानवी वस्तीकडे येऊन हल्ले करू लागले आहेत. त्यामुळे बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.